म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ना.वा.
दा. क्र. ३८९

# दत्ता. जी. कुलकर्णी





BVBK-0400389

ना वा
नों. क्र. ३८७
३८९

# दोन कर्तबगार माणसं

दत्ता जी. कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
क्र. ३८९
विभाग ७ी.वी.

कुलकर्णी प्रकाशन : पुणे ३०

BVBK-0400389

किंमत एक रुपया

प्रकाशिका :

सौ. निर्मला नारायण अरगडे
अरगडे कुलकर्णी प्रकाशन
१६/१२४, लोकमान्यनगर
पुणे–३०.

□

प्रथमावृत्ति, विजयादशमी
१ ऑक्टोबर १९६८
पुनर्मुद्रण जानेवारी १९७५

□

सर्व हक्क प्रकाशिकाधीन

□

मुद्रक :

सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे–३०.

---

: प्राप्तिस्थान :

**अरगडे आणि मंडळी**
अप्पा बळवंत चौक,
**पुणे ३०.**

**सौ. मालिनी कुलकर्णी**
२४३ बद्रिकाश्रम,
१ ली खेतवाडी,
**गिरगाव मुंबई–४.**



पुण्याचा दुसरा सदाशिवरावभाऊ

कर्तृत्ववान माणसाचे मरण जनतेला चुटपुट लावून जाते. असा माणूस अचानक मेला तर जनतेची ही चुटपुट अधिकच वाढते. लोक हळहळतात. उत्स्फूर्त हरताळ पाळतात. शोकसभा होतात. देशभर सर्वत्र त्या माणसाच्या मृत्यूची हळहळ प्रकट होत राहते. असे मरण पुण्याच्या सदाशिवराव बर्व्यांना लाभले. त्यांच्या मरणाने साऱ्या जगाला आश्चर्याचा धक्का बसला.

असे हे बर्वे काही वर्षानुवर्षे राजकारण खेळणारे देशभक्त नव्हते. त्यांच्या देशभक्तीची सुरुवात आता कुठे होऊ लागली होती. भारताचे भाग्य घडविण्यासाठी आता कुठे त्यांच्या गळ्यात लोकसभेच्या चुरशीच्या निवडणुकीची माळ पडली होती. गळ्यातल्या माळेचा यशोगंध जगात सर्वत्र आता कोठे पसरला होता. हारातील फुले अजून सुकलीसुद्धा नव्हती. पण कठोर काळाला त्याची पर्वा थोडीच आहे? तो ध्यानीमनी नसता बर्व्यांना घेऊन गेला.

पुण्याचा हा दुसरा सदाशिवराव दिल्लीला लढाईत असा कामास आला होता. पहिला सदाशिवरावभाऊ पेशवा आणि दुसरा हा सदाशिवराव बर्वा! लाख संकटे झेलणारी सदाशिवरावांची ती निडर मूर्ती आता आपणाला शरीररूपाने दिसणार नाही, पण त्यांच्या कामगिरीची ज्वलंत आठवण सतत आपणाला प्रेरणा दिल्यावाचून थोडीच राहील?

तसे बर्वे कुटुंब कोकणातील. पण नोकरीमुळे ते महाराष्ट्रभर पांगले आहे. सदाशिवरावांचे वडील ब्रिटिशांच्या नोकरीत नानाविध पदावर काम करीत असता अखेरीस ते असिस्टंट कमिशनर झाले. आणि पेन्शन घेतल्यावर ते सांगली संस्थानचे दिवाण झाले. ते तासगावला असताना २७ एप्रिल १९१४ रोजी सदाशिवरावांचा जन्म झाला.

त्यांचे काका गोविंदराव पुण्याला नारायण पेठेत भटांच्या वाड्यात राहात. मुलाच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये म्हणून सदाशिवला त्याचे काकांकडे ठेवण्यात आले.

पुण्याच्या नानावाडा शाळेत त्यांचे नाव घालण्यात आले. कोगेकर, दामले या वर्गातील हुषार विद्यार्थ्यांशी सदाशिवची गट्टी जमली. कारण वर्गात तो सर्वात हुषार होता. बोलण्यात पटाईत होता आणि खेळाडू स्वभावाने तो वर्गांत सर्वांचा बापू झाला. घरीदारी तो बापू बर्वे म्हणून ओळखला जाऊ लागला.

गोविंदकाकांची कडक कोकणस्थी शिस्त आणि बापूचा हुषार समंजसपणा यामुळे बापू अधिकच शिस्तबद्ध झाला.

त्या काळातील राजकीय चळवळीचे परिणाम बापूच्या बाल आणि तरुण मनावर झाल्यावाचून राहिले नाही. पण भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानणारी बुद्धिवादी घडण त्याची असल्याने, अपक्व वयात अविचाराने राजकारणात त्यावेळी पडला नाही. तो सारे काही बुद्धिवादी दृष्टीकोनातून पहात होता. मॅट्रिकला तो शाळेत पहिला आला. तो फर्ग्युसनचा विद्यार्थी झाला. त्याने विचारपूर्वक विषय बी. ए. साठी निवडला. बी. ए. साठी त्याने अर्थशास्त्र हा विषय घेतला. प्राध्यापक डी. जी. कर्वे यांनी त्याला मार्गदर्शन केले. त्याने इंग्रजीवर या काळात प्रभुत्व संपादन केले होते. १९३४ साली इतिहास आणि अर्थशास्त्र घेऊन तो बी. ए. पास झाला. त्याला "एलिस" पारितोषिक व "काबडेन" क्लब मेडल त्याबद्दल देण्यात आले. कॉलेजचा हा बहुमान बापू मुळे झाला.

पुढील शिक्षणासाठी बापू इंग्लंडला १९३४ साली गेला. त्याला निरोप देण्यास आलेल्यात शरयू गुप्ते ही त्यावेळी उपस्थित होती. साऱ्याबरोबर त्याने शरयूचा निरोप घेतला.

आय. सी. एस. होण्यासाठी बापू इंग्लंडला आला. ती अवघड परीक्षा तो पास झाला. केंब्रिजची ट्रायपासचीही परीक्षा त्याने दिली. १९३६ साली लगेच सरकारने त्यांना असिस्टंट कलेक्टर म्हणून नेमले. १९३७ साली सुरतेला ते असिस्टंट कलेक्टर म्हणून काम करू लागले. अर्थात लहानपणाचा बापू बर्वे आता बर्वेसाहेब झाला. सुरतेहून अहमदाबादला सरकारने त्यांना नेमले. बापू असा सनदी नोकरीच्या सोनेरी पिंजऱ्यात अडकला गेला. पण त्याने हे सतीचे वाण बुद्धयाच घेतले होते. त्याला माहीत होते त्याला देशासाठी काहीतरी करायचे आहे. त्यासाठी सरकारी सोनेरी पिंजऱ्यात राहून भागणार नव्हते. ही जाणीव त्याला तो आय. सी. एस. होण्यासाठी निघाला तेव्हासुद्धा होती. तसे पत्र त्याने आपल्या भगिनींना लिहिलेले उपलब्ध आहे. आय. सी. एस. सुभाषबाबूंने धाडसीपणाने सनदी नोकरीच्या पिंजऱ्यास देशसेवेसाठी लाथ मारली. पण ह्या सोनेरी पिंजऱ्यात आहे तरी काय? ते मोडण्यासाठी काय दिव्य करावे लागेल, हे जणु अजमावण्यासाठी बापू बर्वेसाहेब झाले.

त्या काळात ते असा चोखपणे नोकरी बजावत असता भारतीय स्वातंत्र्याची चळवळ प्रतिवर्षी वाढतच होती. हातचे साम्राज्य सोडायला इंग्रज थोडेच तयार होते? पाशवी अत्याचार देशभक्तांवर सुरू झाले. हे पाहून तरुण बर्वेसाहेबांना काय, बरे वाटले असेल?

स्वबांधवांविरुद्ध स्वकर्तव्य त्यांना १९४७ सालापर्यंत नाइलाजाने करावे लागले. मनात असलेले संकल्प अनेकवेळा ह्या नोकरीच्या चौकटीत त्यांना बसविता न आल्याने त्यांचे मन कासाविस झाल्याबाचून थोडेच राहिले असेल? पण गीतेची शिकवण अंगी बाणलेल्या या बापूला आपल्या अवघड मार्गाने जाताना खूपच मानसिक यातना भोगाव्या लागल्या असतील नाही?

बर्वे सनदी नोकर झाल्यानंतर २७ जून १९३८ ला मुंबईला त्यांचे

शरयू गुप्तेशी लग्न झाले. त्यांना वाटले होते, ही मुलगी आता आपले घर उजळील. घरच्यांच्या विरोधाला न जुमानता हे लग्न झाले. लग्न पाहायला त्यांचे वडिल हयात नव्हते. आईने मात्र तो सोहळा पाहिला. मुंबईच्या सचिवालयात ते गृहखात्याचे सचीव म्हणून त्या वेळी काम करीत होते. याच सचिवालयात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी अनेक खात्यांचे चिटणीसपद भूषविले. कमिशनर म्हणून त्यांनी अनेक वर्षे जे काम केले त्या त्यांच्या शिस्तशीर कामाची छाप वरिष्ठ अधिकाऱ्यांवर पडल्यावाचून राहिली नाही.

ते एखाद्या कामावर लष्करी सेनानीच्या शिस्तीत तुटून पडत. त्यामुळे कोणतेही काम त्यांच्यावर सोपविले की ते त्या कामाचा सांगोपांग विचार करून योजनाबद्ध पद्धतीने ते काम अधिकारी व नोकरांकडून करून घेत. शिस्तशीर आणि निस्वार्थी शासक केवढे प्रचंड कार्य यशस्वी करू शकतो याचे बर्वे म्हणजे मूर्तिमंत उदाहरण होय. कोयना-योजना, एस. टी. चे राष्ट्रीयकरण ही प्रचंड कामे ते सचिवालयात उद्योग खात्याचे सेक्रेटरी असतानाच झालेली कामे होत. मुंबईत त्यांनी अशी प्रचंड कार्ये यशस्वी केल्यामुळे दिल्लीकरांचे लक्ष त्यांच्याकडे गेल्यावाचून कसे राहील ? त्या वेळचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख म्हणतात, “ मी अनेक वेळा पुण्यास येत असे. कमिशनर बर्वे यांच्या कामाची मला अशा वेळी माहिती मिळे. लौकिक कानावर येई. त्यामुळे दिल्लीस फरिदाबादनगर उभारणीबाबत जेव्हा गोंधळ उत्पन्न झाला तेव्हा मुंबई सरकारकडे खास विनंती करून त्यांना मी मागून घेतले; आणि मला असे आढळले की, इतरांना अवघड वाटणारा तो प्रश्न श्री. बर्वे यांच्या दृष्टीने फारच सोपा होता. त्या अनुभवानंतर मी श्री. बर्वे यांना दिल्लीत अर्थखात्यात सह-सचिव म्हणून ठेवून घेतले. तेथेही त्यांनी विलक्षण सफाईने काम केले.

विशेषतः आंतरप्रांतीय विक्रीकर आकारणीच्या प्रकरणात त्यांचा माझ्या मंत्रालयाला अतिशय उपयोग झाला. ”

स्वतंत्र भारत घडणीच्या अवस्थेतून जात होता. चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांच्या हातात सत्ता आली होती, पण नियोजन आणि विशिष्ट विषयांचा गाढा व्यासंग यांची जोड मिळत नसल्याने कामाचे गाडे कधी भलत्याच दिशेने वाटचाल करीत राही तर कधी थोडे काम झाल्यावर अडून बसे. अशा वेळी राज्यकर्त्यांना कर्तव्यतत्पर सनदी नोकरांची आठवण होई. अशा नोकरांत बर्व्यांचे नाव त्यांच्या कर्तव्यतत्परतेमुळे हटकून राज्यकर्त्यांच्या नजरेसमोर येई. बर्वे कुठेही असले की त्यांना बोलावण्यात येई. पुढे पुढे असे समीकरण ठरून गेले की जेथे अडचण तेथे बर्वे. म्हणून तर बाळासाहेब खेरांनी भाषामंडळाचे चिटणीस म्हणून त्यांना नेमले. साऱ्या देशभर हिंडून १४ भाषा आणि राष्ट्रभाषा यांच्या संबंधीचा खेर अहवाल म्हणजे चिटणीस बर्व्यांचीच कामगिरी होय. म्हणून तर बाळासाहेब खेर म्हणतात, “श्री. बर्वे यांचे काम मोठ्या कष्टाचे व त्यांना स्वतःला ताप देणारे होते. श्री. बर्वे यांच्या उत्कृष्ट कार्यक्षमतेची ही जोड, भाषामंडळाला लाभली नसती तर ठराविक वेळात ठराविक पद्धतीने कमिशनला आपले काम पूर्ण करता आलेच नसते. ”

शासन, सुशासन कसे होईल याकडे त्यांचे सतत लक्ष असे. ते म्हणतात, “सामान्य माणसाला तुमच्या जागतिक राजकारणाशी कर्तव्य नसते. त्याला आपल्या नळाला पाणी येते की नाही हे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्याला खत, बियाणे वेळेवर कसे मिळेल याची चिंता वाटते. व्यापारी कच्च्या मालाचा पुरवठा कसा करता येईल यात व्यग्र असतो. तर कारखानदार विद्युतबोर्डाची वीज बंद होणार नाही याची हमी मागत असतो. सामान्य पातळीवर आपल्या सुखसोयींबाबत निश्चिती राखणारा राज्यकारभार त्याला हवा असतो. मग सरकार कोठल्याही पक्षाचे असो.”

त्यांची ही नोकरीतील लोकसेवक नजर, म्हणूनच त्यांचे निराळेपण स्पष्ट करू शकली. सुरत, धारवाड, पुणे या ठिकाणी त्यांनी जनमानसात शिरून केलेली प्रचंड कामे, त्यांची बुद्धी व प्रामाणिकपणा आणि खऱ्या लोकशासकाची कर्तव्यतत्परता सिद्ध करतात.

१९४४–४५ ला ते धारवाडला कलेक्टर होते. तेथून ते पुण्याला कलेक्टर म्हणून आले. पुण्याबद्दल त्यांना पहिल्यापासून प्रेम. बालपण आणि शिक्षण येथेच झालेले. जवळचे जिवलग मित्र येथेच मान्यतेला चढलेले. तेव्हा त्यांनी हाती कारभार घेतल्यावर आपुलकीने पुण्याच्या सुधारणेकडे लक्ष दिले. प्रखर बुद्धी, देशसेवानिष्ठ अनुभव, काटेकोर कारभार पार पाडणारा कारभारी, अशा त्रिविध भूमिकेने बर्वे पुण्याच्या बुद्धिवादी, परंपराप्रिय आखाड्यात उतरले होते. त्यांचा कसोटीचा काळ म्हणजे ३० जानेवारी १९४८ ची सायंकाळ होय. म. गांधींचा खून पुण्याच्या एका ब्राह्मणाने केला. ब्राह्मण, अब्राह्मण वादाचे काचेचे भांडे, या धक्क्याने खळ्कन फुटले. व्यक्तिगत हेवेदावे उफाळून वर आले. लुटालूट, जाळपोळ यांनी सर्वत्र उठाव केला. यात पुण्याच्या पश्चिमेला-सुद्धा, पुण्याच्या पूर्वेचा दाह जाणवला. भडका उडाला होता. पुणे पेटून उठले असते, पण कलेक्टर बर्वे यांनी वेळीच या राग-द्वेषाच्या ज्वाला अत्यंत शिताफीने हाताळल्या. थोडीफार झळ पुण्याला लागली; नाही असे नाही. पण सारे पुणे जळून खाक झाले असते, ते संकट केवळ त्यांच्यामुळे टळले. गुंडांची धरपकड करून त्यांची त्यांनी ताबडतोब येरवड्याच्या तुरुंगात रवानगी केली. नवापूल ते मंडई रस्त्याने नाकेबंदी करून पुण्यात त्यांनी संचारबंदी लागू केली. डी. एस. पी., हजारो पोलिस, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट बर्व्यांच्या आज्ञा अमलात आणीत होते. पुण्याची होळी त्यांनी होऊ दिली नाही. कलेक्टर म्हणून ते जसे पुण्याला गाजले, तसेच प्रशासक म्हणूनही ते गाजले. कमिशनर

बर्व्यांच्या कारकीर्दीत पुणे सुधारले. या संबंधी एका लेखात ते स्वतः म्हणतात, "१९४९ ला मी पुणे येथे मुख्य अधिकारी म्हणून गेलो, तेव्हा साऱ्या राज्यात अत्यंत अकार्यक्षम महानगरपालिका म्हणून पुण्याच्या पालिकेचा लौकिक होता......चांगल्या कामाची दखल घेणारा सत्ताधारी आहे ही जाणीव राज्यकारभार सुधारण्यास उपयुक्त ठरते. त्याच बरोबर कामात हेळसांड किंवा दुर्लक्ष झाल्यास क्षमा केली जाणार नाही ही जरबही हवी."

स्वतःच्या कर्तव्याची जाणीव या शासकाला होती. म्हणून तर ता सनदी नोकरीच्या चौकटीत शेवटपर्यंत राहू शकला. त्याच्या देशप्रेमाने त्याला अखेरीस त्या चौकटीच्या मर्यादा चांगल्या स्पष्ट केल्या. पण ही चौकट तोडण्यापूर्वी पुन्हा एकदा त्यांच्या प्रिय पुण्याने त्यांना १९६१ साली बोलावले. नव्हे, पानशेतच्या प्रलयाने बर्वे स्वतःच पुण्याच्या मदतीला धावले. त्यावेळच्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजे यशवंतराव चव्हाणांनी, त्यांना सर्वाधिकार देऊन पुण्याच्या पुनर्वसनाचे अवघड काम त्यांच्यावर सोपविले आणि बर्वे कामाला लागले. पानशेतचे पानपत त्यांनी होऊ दिले नाही. जबरदस्त आत्मविश्वासाने त्यांनी अहोरात्र हजारो लोकांच्या सहाय्याने पुनर्वसनाच्या योजना तयार करून पुण्यावर आलेली अवकळा दूर केली.

पण बाहेर असे प्रचंड यश ते मिळवीत असताना घरात मात्र त्यांचे आणि शरयूचे फारसे पटले नाही. याबाबतीत त्यांनी आपले दुःख कधी अगदी जवळच्यांनासुद्धा सांगितले नाही. त्यामध्ये कोण कुठे चुकले हे सांगणे कठिण आहे. एवढे मात्र खरे की अखेरीस त्यांनी आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेतला. काव्यवेडा हा प्रशासक घरी मात्र असा एकटाच आपल्या काव्याशी रमत राहिला. गालिब त्यांना फार प्रिय होता. अनेक

कवितांच्या ओळी त्यांनी आपल्या डायरीत सुवाच्य अक्षरात लिहून ठेवल्या आहेत. गालिबचा हा शेर म्हणूनच का त्यांना आवडत होता—

" मंजिल नहीं
मंजिलका पताही नहीं
ये है एक रास्ताही रास्ता ! "

बर्वे काम करीत होते. अवघड कामे सतत सरकार या सनदी नोकराला हुडकून त्याच्यावर निर्धास्त सोपवीत होते. बर्वे ते काम तडफेने आणि योजनापूर्वक करीत होते. त्यामुळे मुंबई आणि दिल्ली येथील भल्या भल्या मंत्र्यांच्या नजरा त्यांच्यावर पडल्यावाचून राहिल्या नाहीत. पण आपले हे कार्य सोनेरी पिंजऱ्यातल्या पक्ष्याचे सुस्वर गाणे ऐकण्यासारखेच होय. म्हणून तर २५ वर्षे निष्कलंक अनेक जागांवर काम करून अखेरीस पेन्शन न घेता ते काँग्रेसच्या उंबरठ्यावर येऊन उभे राहिले. त्यावेळी त्यांनी आपले मन उघडे केले. ते म्हणतात, " महाराष्ट्राच्या जनमनाची धारणा स्थूलमानाने समाजवादी आहे. दारिद्र्याच्या समान पातळीवर आज महाराष्ट्र समाजवाद शिकत आहे म्हणायचा ! " भाषामंडळावर मोलाचे काम केल्यावर १९५६ साली चव्हाणांनी त्यांना पुन्हा मुंबई राज्यात बोलावून घेतले. विविध खात्यांचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी काम केले. चव्हाण बर्व्यांकडे मराठी जीवनाचे हितसंबंध सुरक्षित राखणारे एक विश्वस्त कारभारी म्हणून पहात होते. द्विभाषिक मुंबई राज्याचे त्यांनी अत्यंत जवळून काम केल्याने, अनेक राजकीय हितसंबंधांचे बारकावे त्यांना चांगले माहित झाले होते. बर्व्यांच्या कामाची कदर, गुणग्राहकता जशी बाळासाहेब खेरांनी ओळखली तशीच यशवंतरावांनीही ओळखली होती. म्हणून तर असा हा लाखातला कारभारी सनदी नोकराऐवजी सहकारी मित्र म्हणून मिळाला तर त्याला मंत्री करणे

फारसे अवघड काम नव्हते. आणि म्हणूनच जानेवारी १९६१ च्या प्रजासत्ताक दिनी बर्व्यांनी सेवानिवृत्त होण्याचा आपला विचार जाहीर केला. सुटबुटातले बर्वेसाहेब, लोकसेवक बर्वे म्हणून कॉंग्रेसच्या उंबरठ्यावर उभे राहिले. अर्थात पूर्वीचा वेष देशसेवकाला शोभणारा नसल्याने त्यांनी लगेच चुणीदार पायजमा, नेहरू सदरा, जाकिट आणि पठाणी वहाणा असा साधा पोशाख आपल्यासाठी निवडला. आणि उत्तम नेता कसा होऊ शकतो ते त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने जगाला दाखवून दिले. आपण कॉंग्रेस पक्ष का निवडला याची त्यांनी त्यांच्या दृष्टीने बुद्धिवादी दृष्टिकोनातून उकल केली. पण इतर राजकीय पक्षांनी ते कॉंग्रेसतर्फे उभे राहतात असे म्हटल्यावर कंबरा कसल्या. पुण्याच्या शिवाजीनगर मतदार संघातून म्हाळगीविरुद्ध त्यांनी सामना दिला. बर्वे पुण्याचे, पुण्यासाठी झिजलेले. पण राजकारणात ते उतरले आणि प्रशासक म्हणून त्यांनी केलेल्या विविध कार्यांची जाण असूनही विरोधक केवळ निवडणूक जिंकण्यासाठी त्यांना नाना प्रश्नांनी बेजार करू लागले. प्रत्यक्ष त्यांच्या घटस्फोटित पत्नीनेही त्यांना 'बैल' म्हणायला कमी केले नाही. अखेर विजयश्रीने या लोकशासकाला माळ घातली. बर्वे जिंकले, मंत्रिमंडळात गेले, मंत्री झाले. पण मंत्र्यांच्या खुर्चीवर जाऊन बसल्यावर त्यांच्या मनातील संकल्प सिद्धीस न्यायला त्यांना पदोपदी अडथळे येऊ लागले. ते महाराष्ट्राचे अर्थमंत्री झाले. पण त्यांनी ठेवलेली खर्चाच्या कठोर छाननीची पद्धत इतर मंत्र्यांना जाचक वाटू लागली.

यशवंतराव दिल्लीला गेले. कन्नमवार मुख्यमंत्री झाले. मंत्रिमंडळात बदल झाला. कन्नमवार अकाली निधन पावले. नाईक मंत्रिमंडळात त्यांना उद्योगखाते देण्यात आले. या ठिकाणीही त्यांनी अर्थखात्याप्रमाणेच अनेक औद्योगिक योजना आणि वसाहती यांचे आराखडे तयार केले. आज मुंबईबाहेर ज्या अनेक शहरात औद्योगिक वसाहती सुरू झालेल्या

आहेत त्याचे श्रेय बर्वे (उद्योगमंत्री) यांनाच द्यावे लागेल. पण त्यांना दिल्लीने बोलावून घेतले.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांना फार काळ काम करण्याचा योग नव्हता असे दिसते. प्रशासक म्हणून त्यांचे बरेच आयुष्य महाराष्ट्र, गुजराथ आणि कर्नाटकात गेले. तेथील स्थानिक राजकारणात न पडता त्यांनी जबर आत्मविश्वासाने आणि प्रखर तळमळीने कार्य केले. त्या कार्यामुळे त्यांचे शासनकौशल्य आणि कामाचा उरक सरकारच्या आणि जनतेच्या डोळ्यात भरल्यावाचून राहिला नव्हता.

भारत स्वतंत्र झाल्यावर अशा कार्यक्षम प्रशासकाला वरच्या पातळीवरून अनेक वेळा कार्य करण्याची संधी भारत प्रशासनाने आणि महाराष्ट्र प्रशासनाने दिली. ती प्रत्येक संधी त्यांनी संधीसाधूपणाने स्वार्थासाठी वापरली नाही. म्हणूनच भारत सरकारने त्यांना अत्यंत जबाबदारीच्या अशा नियोजन समितीवर नेमले. नियोजन समितीचे काम त्यांनी हाती घेतले. पण भारताचे दुर्दैव ! पाकिस्तानशी वाटाघाटी करायला गेलेले शास्त्रीजी ताश्कंदला हृदयक्रिया बंद पडून मरण पावले.

१९६७ च्या निवडणुकीत बर्वे, मेनन यांच्या विरुद्ध उभे राहिले. ज्या मेननना निवडून आणायला त्या पूर्वी मुंबई काँग्रेसने आणि स्वतः नेहरूंनी भरघोस सहाय्य दिले होते, तेच मेनन केवळ तिकीट मिळाले नाही नाही म्हणून काँग्रेस सोडून बाहेर पडले. त्यांच्या विरुद्ध बर्व्यांना उभे करण्यात आले. हा अटीतटीचा सामना तत्त्वांचा होता. साऱ्या जगाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. बर्वे घरोघर हिंडले, झोप विसरले, अनेकांना भेटले. पैसेवाल्यांना वाटले बर्वे पैसे मागायला, मोटारी मागायला आपल्याकडे येतील. हे सर्व आपण त्यांना पुरवू. ते निवडून आले की मंत्री होतील. म्हणजे दामदुपटीने सारे वसूल करू. पण अशी विकत

मते बर्व्यांनी घेतली नाहीत. त्यामुळे घाटकोपर, मुलुंड येथील गुजराथी धनिकांना ते काँग्रेसचे असूनही त्यांच्याबद्दल आपुलकी वाटली नाही. अखेरीस ते ७००० मताधिक्यांनी मेननचा पराभव करून निवडून आले. यासंबंधी ते म्हणाले, "ईशान्य मुंबई मतदार संघात झालेला हा लोकशाही समाजवादाचा, जनतेचा विजय आहे. या लढाईत सैनिक, सेनानी, गोलंदाज, तिरंदाज आघाडीचे वीर सारे आपणच आहात! फक्त ध्वज माझ्या खांद्यावर आहे."


'बर्वे झिंदाबाद!'ने सारी मुंबई दुमदुमून गेली. सत्काराच्या माळा गळ्यात पडल्या. उत्स्फूर्त मिरवणुका निघाल्या. फुलांचे ओझे झाले. मेननना बर्व्यांनी पाडले या घटनेने सारे जग चकित झाले. सत्कारसभा होऊ लागल्या. डोंबिवलीच्या बाजीप्रभू चौकात ह्या विजयी वीराला लाख डोळ्यांच्या मंगल आरतीने ओवाळले. दृष्ट लागण्यासारख्या त्या समारंभाला कुठल्या तरी अशुभाची दृष्ट खरोखरच लागली. नंतर तीनच दिवसांनी ६ मार्च १९६७ ला ते मंत्री होणार हे जवळ जवळ ठरल्या-सारखे होते. सत्कार समारंभात पागे म्हणाले होते —

"दिल्लीत हेकट किंवा भेकड लोकांचे राज्य जनतेला नको आहे. म्हणून बर्वेसाहेब, तुम्ही दिल्लीला जात आहात."

दिल्लीला गेलेले बर्वे खूप थकलेले होते. त्यांनी निवडणुकीसाठी अहोरात्र श्रम घेतले होते. एकाएकी ते आपल्या नोकराला म्हणाले, "माझी दृष्ट काढायला सांग!" पण दृष्ट काढणारे घरात तेव्हातरी कोण जवळ होते? सतत एकटा लढणारा तो एकाकी जीव अखेरीस या नश्वर जगातून गेला. अचानक सारे घडले. ते जमिनीवर कोसळले. डॉक्टर आले, पण सारे संपले होते. ताश्कंदला शास्त्री जसे अचानक गेले, तसेच बर्वे

दिल्लीला अचानक गेले. दोघांच्याही मृत्यूच्या वार्तेवर कोणाचाच विश्वास बसला नाही. गेले, बर्वे गेले; अखेरीस बर्वे गेले ! एक दिवस जाणारच होते. पण अशा भारताच्या ऐन अडचणींच्या वेळी ते अचानक निघून जायला नको होते !

❧ ❧




विद्वत्तेचा राजाबाई टॉवर

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाचे बीजारोपण केले. पिढ्यानपिढ्या हाती नांगर घेतलेली ही मंडळी अक्षरांच्या ओळी लिहायला, मान मोडून शाळेत बसायला सुखासुखी तयार झाली नाहीत. फुले पति-पत्नींच्या अपार कष्टामुळे अखेरीस बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा अंकुर महाराष्ट्राच्या या कसदार भूमीत रुजला. हलके हलके तो वाढू लागला.

कोल्हापूरचे श्री. शाहू छत्रपती आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या अंकुराची जोपासना केली. त्याला संरक्षण देऊन वाढविले आणि कसदार काळ्या जमिनीत भरघोस पीक काढणारी ही मंडळी शिक्षणाच्या क्षेत्रातसुद्धा भरघोस कर्तृत्वाने आता चमकू लागली आहेत. महाराष्ट्राचे आणि भारताचे नेतेपद म्हणूनच बहुजन समाजाच्या शिल्पकारांकडे आता झुकू लागले आहे.

पण आजच्या या नेतृत्वाला खतपाणी घालण्याचे आणि जोपासण्याचे कार्य अनेकांनी जरी केले असले तरी त्यात खंडेराव बागल, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, केशवराव जेधे, महर्षी शिंदे, केशवराव ठाकरे, मुकुंदराव पाटील, पंजाबराव देशमुख, नाना पाटील आणि शंकरराव मोरे ही मंडळी प्रमुख होत.

शंकरराव मोरे बहुजनसमाजाचेच नव्हे तर महाराष्ट्रीय राजकारणाचे सूत्र पुण्याहून कित्येक वर्षे हलवित होते. पुण्यात खट्ट वाजले तर त्याचे पडसाद अजूनही महाराष्ट्रात उठतात. पुणे म्हणजे महाराष्ट्राच्या नानाविध चळवळींचे आगर होय. म्हणूनच की काय अजूनसुद्धा राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींचा सूत्रपात पुण्यात होत असावा.

दिनांक एक ऑगस्ट १८९९ ला शंकररावांचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव शंकरराव शांताराम मोरे होय. पुण्याच्या मुठेच्या पाण्याचा असा काही गुण असावा की, त्यामुळे पुणेकरांच्या स्वभावात जरा आड-मुठेपणा निर्माण होत असावा. खोचक बोलण्याचे बाळकडू प्राशन

केल्यामुळे हा आडमुठेपणा अधिकच बाळसे धरीत असावा. यातूनच शंकररावांचे झुंजार नेतृत्व विकास पावले असावे.

त्यांचे प्राथमिक शिक्षण पुण्यालाच झाले. माध्यमिक शिक्षणसुद्धा त्यांनी पुण्यालाच पूर्ण केले आणि ज्या कॉलेजने महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय कीर्तीची अनेक बुद्धिमान माणसे दिली त्या फर्ग्युसन कॉलेजमधे त्यांनी आपले नाव उच्च शिक्षणासाठी दाखल केले. पहिल्यापासून राजकारणाकडे ओढा असल्याने त्या काळात त्यांनी अनेक पुस्तके वाचली. साहित्य आणि राजकारण याची गाडी त्यांना त्यामुळे वाढीस लावता आली. १९२५ साली ते बी. ए. झाले. १९२७ साली त्यांनी एलएल. बी. ची परीक्षा दिली.

१९२८ सालापासून त्यांनी पुण्याच्या कोर्टात वकिली सुरू केली. लवकरच ते महाराष्ट्रात एक हुशार वकील म्हणून ओळखले जावू लागले. या काळात ते आपल्या वकिलीच्या व्यवसायामुळे गरीब जनतेशी परिचित झाले. न्यायदेवतेचा आंधळेपणा आणि स्वार्थासाठी दुष्टांची चाललेली गुंडगिरी यांचे वास्तव दर्शन त्यांना कोर्टाच्या आवारात रोज घडू लागले. बुद्धिमान आणि भावनावश शंकररावांचे तरुण संवेदनशील मन थोडेच गप्प बसणार होते! त्यांनी हातात लेखणी उचलली! पाहिल्या—ऐकलेल्या ह्या सत्यघटनांवर त्यांनी कथांचा साज चढविला. जिवंत जाणीवेतून त्यांनी लिहिलेल्या या कथा म्हणजे सामाजिक अन्यायावर ठेवलेले बोट होय.

'वेडेवात्सल्य' या कथासंग्रहात त्यांचे कथाकार म्हणून आपणाला दर्शन घडते. त्यातील 'वेडेवात्सल्य' नावाच्या या कथेत भांडी घासणाऱ्या चंद्रा मोलकरणीची व्यथा कथा बनली आहे. चंद्राच्या घरांत राजरोसपणे राहणारी गिरीजा ही तिच्या नवऱ्याची घरात ठेवलेली लाडकी बाई होती. चंद्राचे सौंदर्य आणि तिचा मुलगा तिच्या छळाला कारणीभूत झाले.

गिरीजेने एक दिवशी आपल्या दारूड्या प्रियकराकराकडून त्या दोघांना नुसता मारच बसविला नाही तर भर पावसात घराबाहेर काढले. चंद्राचा एकुलता एक आधार नष्ट झाला. चंद्रा वेड्यासारखी वागू लागली. पण आपल्या मुलासारख्या दिसणाऱ्या जपानी बाहुल्यामुळे तिचे वेडे वात्सल्य पुन्हा प्रकटले.

"देवाशपथ खरं सांगेन, खोटं बोलणार नाही" या कथेत जीवनातील विदारक सत्य लेखकाने प्रकट केले आहे. मानाजी पाटलाचा सरळ पैलू यात लेखकाने अधिकच तेजस्वी केला आहे.

"बापाची जमीन" या कथेत सावकाराच्या पंजात गेलेली जमीन सोडविण्यासाठी दशरथ काय भगिरथ प्रयत्न करतो ते सांगितले आहे.

ताडीच्या ताजमहालात बसून श्रमजीवी लोक आपल्या जीवनाची मजा कशी लुटतात, त्याचे विदारक चित्र 'टांगेवाला' या कथेत आहे.

'बळी' या कथेत चंदर हा मुलगा बापाच्या अज्ञानामुळे कसा नाहक प्राणाला मुकतो, त्याचे चित्र आहे. अर्थात खेड्यातील देवभोळी सुशिक्षित माणसे आपल्या पोटाच्या पोरालासुद्धा अज्ञानामुळे कसे मुकतात ते वाचले म्हणजे मन क्षणभर खिन्न होते.

'आत्महत्या' या कथेत काळी, कुरूप, देवीचे वण असलेली मंजुळा जनतेच्या उपहासाला कंटाळून आत्महत्येला प्रवृत्त होते. पण बेवारशी रस्त्यावर टाकलेल्या मुलाला आपल्या हताश जीवनात स्थान देऊन ती आत्महत्येचा विचार कसा सोडते त्याचे चित्रण वाचताना वाचकाचे मन द्रवल्यावाचून राहणार नाही.

या सहा कथा सहा व्यथा आहेत. खासदार शंकरराव मोरे जर राजकारणात पडले नसते तर त्यांनी निश्चित अशा अनेक व्यथांना बोलके केले असते.

अशा कथा त्यांनी पाहिल्या. त्यांच्या व्यथा त्यांना जाणवल्या म्हणूनच

त्यांना समाजात क्रांती घडावी असे वाटत होते. ह्या सामाजिक विषमतेमुळे त्यांच्या मनावर गांधीवादापेक्षा मार्क्सवादाचा अधिक प्रभाव पडला. कम्युनिस्ट विचारसरणीकडे ते त्यामुळेच खेचले गेले असावेत !

आपला वकिलीचा व्यवसाय यशस्वीपणे सांभाळून ते जसे लिखाण करीत होते त्याप्रमाणे ते राजकीय क्षेत्रातही प्रत्यक्ष चमकू लागले होते. १९३१ ते १९३५ पर्यंत ते पुणे जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद म्हणून निवडले गेले होते. ह्या निवडीचा त्यांनी केवळ खुर्ची आडविण्यासाठी उपयोग केला नाही तर त्यांनी या काळात पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षकांवरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला.

शंकरराव मोरे शरीराने चांगले उंच, डोक्यावर तिरकी गांधी टोपी, डोळ्याला चष्मा, अंगात कोट. छाप पाडणारे व्यक्तित्व, त्यामुळे शंकरराव मोरे कोठेही असले, कोठेही दिसले तरी ते पाहणाऱ्यांच्या एकदम लक्षात भरत. पोशाख साधा, त्यात भपकेबाजपणा नाही. पुण्याच्या मातीत लहानाचे मोठे ते झाले. व्यवसाय वकिलीचा त्यामुळे प्रतिपक्षाला नामोहरम करणारी खोचक भाषा आणि अचूक हल्ला करण्याची त्यांची तयारी यामुळे ते केवळ कोर्टातच प्रतिपक्षावर मात करीत नसत. व्यासपीठावर काय किंवा पक्ष बैठकीत काय ते अचूक मात करीत. त्यांनी केलेला हा मारा अनेकांना सहन होत नसे. त्यामुळे त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात अनेक मित्र गमवले. अनेक निंदकांना त्यांनी निर्माण केले. असे जरी असले तरी भाई माधवराव बागल म्हणतात त्याप्रमाणे शंकरराव मोरे म्हणजे मराठा समाजातील विद्वत्तेचे राजाबाई टॉवर होत !

त्यांच्या विद्वत्तेची कल्पना आल्यामुळेच की काय मुंबई विद्यापीठाने त्यांना १९३३ ते १९३८ या काळात फेलो म्हणून नेमले होते. याच काळात ते पुन्हा पुणे जिल्हा लोकलबोर्डाच्या निवडणुकीत दुसऱ्यांदा निवडून आले. त्यांची बुद्धिमत्ता, कामाचा उरक आणि प्रभावी भाषणशैली

या गुणांच्या जोरावर त्यांनी १९३५ ते १९४० या काळात पुणे जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून काम केले होते. सरकारने नेमलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था चौकशी समितीचे सभासद म्हणून १९३८ ते १९३९ व १९४६ ते १९४८ या काळात सरकारने नेमलेल्या न्याय व अंमलबजावणी फारकत चौकशी समितीचे सभासद म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती.

अशा रीतीने त्यांचे समाज विकासाचे चौफेर कार्य सुरू होते. राजकारण, समाजकारण, शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था, वाङ्मय आणि वृत्तपत्रकार अशा बहुविध प्रकारे ते देशसेवा करीत होते. बुद्धीला पटेल ते सडेतोड तोंडावर सांगण्याने त्यांनी त्या काळात जसे नवीन तरुण कार्यकर्ते आपल्याकडे आकर्षित करून घेतले. तसेच आपल्या बरोबरीचे असंख्य मुरब्बी देशसेवकांचे शत्रुत्वसुद्धा त्यांनी निर्माण केले. बरोबरीच्या पुढाऱ्यांना त्यांची ही जहरी टीका सहन झाली नाही. अखेरीस त्यांनी १९४८ ला केशवराव जेधे आणि इतर अनेक सहकाऱ्यांसह कॉंग्रेसला रामराम ठोकला. कॉंग्रेस, शेतकरी कामकरी लोकांचे भले करीत नाही असे पाहून त्यांनी महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला.

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रचारासाठी त्यांनी जनसत्ता नावाने एक साप्ताहिक काढले. जनतेच्या हाती सत्ता येण्यासाठी त्यांनी दर आठवड्याला आपले स्फोटक पण मुद्देसूद विचार जनतेपुढे मांडण्याला सुरुवात केली. त्यांच्या प्रचाराचा परिणाम हलके हलके दिसू लागला. त्यांनी पक्षाचे पहिले अधिवेशन दाभाडी येथे सर्वांच्या संमतीने भरविण्याचे ठरविले. या पहिल्या अधिवेशनाला महाराष्ट्रातून हजारो लोक जमले होते. या अधिवेशनापुढे त्यांनी जो प्रबंध वाचला तो 'दाभाडी प्रबंध' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. या प्रबंधात त्यांनी शेतकरी आणि कामगार यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचे तर्कपूर्ण बुद्धिवादी दृष्टि-

वाङ्मय
विषय

कोनांतून मांडणी केली आहे. दाभाडी अधिवेशनांतून स्फूर्ती घेऊन अनेक कार्यकर्ते आपापल्या गावी परतले. त्यांनी या नवीन पक्षाचा आपापल्या गावी धडाक्याने प्रचार सुरू केला.

मोरे पुण्याचे असूनसुद्धा सोलापूरहून शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून लोकसभेसाठी उभे राहिले. सोलापूर जिल्ह्याने त्यांना प्रचंड बहुमताने निवडून दिले.

शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्रात आता चांगलाच मूळ धरू लागला होता. जवळ जवळ महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यापैकी चौदा जिल्ह्यात या पक्षाचा प्रभाव पडू लागला होता. आठदहा वर्षे हा पक्ष बहुजन समाजात मानाचे पान पटकावून बसल्याने महाराष्ट्र काँग्रेसला चांगले खिंडार त्यामुळे पडले. म्हणून काँग्रेस नेत्यांनी त्यांना पुन्हा काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता.

या काळात धाठार, सांगली येथे शेतकरी कामगार पक्षाची अधिवेशने यशस्वीपणे भरली आणि गाजली. सांगली येथे भरलेल्या १९५३ च्या अधिवेशनापूर्वी ते म्हणाले होते, " पक्षविसर्जनाची आता वेळ आली आहे. पक्षाचे ऐतिहासिक कार्य आता संपले आहे. "

असे ते जरा वैतागूनच म्हणाले असावेत. कारण जनसत्ता हाती यायला लोकशाहीत बहुमत लागते. बहुमतवाल्या पक्षाला देशाचा गाडा हाकायचा नंतरच मान मिळतो. असे बहुमत काँग्रेसशिवाय इतर सर्व पक्षांची एकजूट झाल्याशिवाय होणे शक्य नाही. हा अनुभव त्यांना गेल्या आठ-दहा वर्षांत आला होता. अहिंसा आणि गांधीवाद यावर त्यांचा विश्वास नव्हता. समाजवादी, क्रांतिकारक अशी त्यांची विचारसरणी होती. काँग्रेसमधे नवे नेतृत्व कार्य करू लागले होते. तेव्हा काँग्रेसमधे प्रवेश करून समाजवादी विचारांवर लक्ष ठेवून कार्य करता येईल असे वाटल्यावरून त्यांनी आणि इतर बहुजन समाजाच्या अनेक पुढाऱ्यांनी

काँग्रेसमधे प्रवेश करण्याचे ठरविले होते. अशा रीतीने काँग्रेसमधून बाहेर पडलेले पूर्वीचे बहुजनसमाजातील जुने पुढारी केशवराव जेधे, शंकरराव मोरे, र. के. खाडिलकर, तुळशीदास जाधव, माधवराव बागल, काकासाहेब वाघ पुनः काँग्रेसमधे एकत्रित झाले.

काँग्रेसमधे क्रांतिकारक समाजवादी बदल घडवून आणण्याची त्यांची तळमळ होती. त्या दृष्टीने ते आणि जेधे सतत प्रयत्न करीत होते. महाराष्ट्राच्या राजकारणात जेधे–गाडगीळ ही जोडी जशी गाजली आहे, तशीच जेधे–मोरे ही जोडीही गाजली आहे.

१९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते काँग्रेसतर्फे पुण्यामधून लोकसभेवर निवडून आले होते.

१९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात आणि १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेसमधे ते डाव्या-गटाचे, प्रखर विरोधक म्हणून ओळखले जात होते.

मराठी भाषेप्रमाणे इंग्रजी भाषेवरही त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. ‘जनसत्ते’मधे त्यांनी राजकीय आणि सामाजिक लिखाण केले. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक मराठी नियतकालिकातून कथा, नाटिका, सामाजिक आणि राजकीय लेख लिहिले. ‘महात्मा फुले’ हे चरित्र, ‘आमदार’ ही नाटिका पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली आहे. त्यांचे बहुविध लेख पुस्तक आकारात आज उपलब्ध नाहीत.

त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकांपैकी पुढील चार पुस्तके जनमान्यता पावली आहेत.

(१) प्रॅक्टिस अॅण्ड प्रोसीजर ऑफ इंडियन पार्लमेंट म्हणजे भारतीय संसदेचा व्यवहार व कामकाज या संबंधीचा ग्रंथ. (२) रीमॉडेलिंग ऑफ डेमॉक्रसी फॉर अॅफ्रो-एशियन नेशन्स (३) ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट (४) मशिनरी फॉर रूरल प्लॅनिंग.

पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन खुद्द जवाहरलाल नेहरूं यांनी केले होते. या पुस्तकाला त्यावेळेचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी प्रस्तावना लिहिली होती. तर दुसऱ्या पुस्तकाला डॉ. झकीर हुसेन यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे.

पत्नीच्या निधनानंतर शंकरराव खासदार म्हणून निवडून आले तरी त्यांचा बराच काळ आजाराशी झगण्यात गेला. मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमधे त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. प्राणवायुवर शेवटी शेवटी त्यांना ठेवण्यात आले. अखेरीस हा झुंजार नेता मृत्युशी झुंजता झुंजता ५–३–१९६६ रोजी दोन वाजता चिरनिद्रिस्त झाला.

राजकारणी, झुंजार शंकररावजी शरीररूपाने जरी आपल्यातून गेले असले तरी त्यांच्या लेखणीने निर्माण केलेले त्यांचे बहुविध साहित्य बहुजन समाजाला बहुजन हिताय प्रेरणा देत राहील!

म. ग्रं. सं. ... वाचनालय शाखा.
बाल ... विभाग.
दा. क्र. 3Ce ... दिनांक ......
विषय ... क्र. ......

BVBK-0400389

पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन खुद्द जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. या पुस्तकाला त्यावेळेचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी प्रस्तावना लिहिली होती. तर दुसऱ्या पुस्तकाला डॉ. झकीर हुसेन यांनी प्रस्तावना लिहि-लेली आहे.

पत्नीच्या निधनानंतर शंकरराव खासदार म्हणून निवडून आले तरी त्यांचा बराच काळ आजाराशी झगण्यात गेला. मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमधे त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. प्राणवायुवर शेवटी शेवटी त्यांना ठेवण्यात आले. अखेरीस हा झुंजार नेता मृत्युशी झुंजता झुंजता ५–३–१९६६ रोजी दोन वाजता चिरनिद्रिस्त झाला.

राजकारणी, झुंजार शंकररावजी शरीररूपाने जरी आपल्यातून गेले असले तरी त्यांच्या लेखणीने निर्माण केलेले त्यांचे बहुविध साहित्य बहुजन समाजाला बहुजन हिताय प्रेरणा देत राहील !

म. ग्रं. सं. ... ग्रंथालय शाखा.
बाल ... विभाग.
दा. क्र. ३८९ ... दिनांक ......
विषय बा.वा. ... क्र. ... ....

BVBK-0400389